**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१

दूरध्वनी क्र: ०२२-२२०१३५७८ **Email ID :** soyojana11.rdd-mh@nic.in


---

क्रमांक-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२/यो-११ दिनांक: ०६ ऑगस्ट,२०२५

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,(सर्व)

**विषय-** **आगामी " मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान " अंतर्गत आयोजित करावयाच्या कार्यक्रमांच्या खर्चाबाबत.**

**संदर्भ-** ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र:-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२,E-११२३०५७ /यो-११ दि. ०६ ऑगस्ट, २०२५.

महोदय,

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानास, संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. उक्त अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरावर प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

२. सदर अभियान नवीन योजनेअंतर्गत राबविण्यात येणार असल्याने, त्यासाठी लेखाशीर्ष मंजूरीसह निधी अर्थसंकल्पित करुन, प्रत्यक्ष निधी उपलब्ध होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. परंतु, सदर अभियान राबविण्याची तयारी ऑगस्ट, २०२५ सुरु झाली असल्याने, या अभियानासाठीचे कार्यशाळा व प्रशिक्षणाचे आयोजन, प्रचार व प्रसिद्धी , प्रवास खर्च, साहित्य व स्टेशनरी इत्यादी बाबींवरील खर्च जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील
आप - आपल्या स्वनिधीतून करावा.

३. अभियानाकरिता लेखाशीर्ष व निधी उपलब्ध होताच पुढील कार्यवाहीसंबंधी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. आपण या अनुषंगाने आवश्यक नियोजन करून, अभियानाचा प्रारंभ प्रभावीपणे करावा, ही विनंती.

आपला,

(कालू वळवी)

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत:-१. विभागीय आयुक्त (सर्व)

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, (सर्व)

३.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)